लोकमत मुंबई 1,5

न्यूज Inbox

## महिलेची फसवणूक

नालासोपारा : शिर्डी नगरच्या ओम साई वेल्फेअर सोसायटीत राहणाऱ्या दीप्ती गोणबरे (३८) यांची शुक्रवारी पैशाचे आमिष दाखवून तीन आरोपींनी फसवणूक केली. त्या सनशाईन सर्कल येथील रस्त्याने त्यांच्या घरी चालत जात होत्या. त्यावेळी त्यांना एका महिलेसह तीन आरोपी रस्त्यात भेटले. आरोपींनी त्यांना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्या गळ्यातून सोन्याचे मंगळसूत्र, चेन आणि कानातले असे एकूण ९० हजारांचे सोन्याचे दागिने घेऊन त्यांची फसवणूक केली. आचोळे पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## कोटीचे अमली पदार्थ जप्त

नालासोपारा : नायगावच्या भदोरिया डॅम मुख्य रस्त्यावर गुरुवारी रात्री अमली पदार्थ विरोधी कक्षाच्या पोलिसांनी अमली पदार्थ पकडला आहे. आरोपी मोहम्मद मोनीस गौर (३१) याने स्वतःच्याजवळ १ करोड ४२ लाख ८० हजार रुपये किमतीचा हेरॉईन हा अमली पदार्थ विक्रीसाठी साठवलेला सापडला. पोलिस अंमलदार महेश पागधरे यांनी नायगांव पोलिस ठाण्यात शुक्रवारी तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे. नायगांव पोलिसांनी आरोपीला अटक करून अमली पदार्थ जप्त केला आहे.

# तीन पीडित महिलांची सुटका, चौघांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नायगावमध्ये ससूनवघर येथील एका हॉटेलमध्ये वेश्याव्यवसाय केल्याप्रकरणी ४ आरोपींना अटक, तर ३ पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे.

मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील ससूनवघर येथील सेल्फी ढाबा हॉटेलमध्ये वेश्याव्यवसाय करणाऱ्या १८ ते ३३ वयोगटातील ३ पीडित महिलांची गुरुवारी रात्री सुटका करण्यात यश मिळाले आहे. आरोपी मॅनेजर बाबूलाल पासवान (३७), वेटर देवनंदन पासवान (२९), शिवानंद पासवान (२१) आणि अशोक यादव (३८) या चौघांनी तीन पीडित महिलांना प्रवृत्त करून वेश्यागमनाच्या मोबदल्यात रक्कम ठरवून स्वतःच्या उपजीविकेकरिता रक्कम स्वीकारली. पोलिस अंमलदार रोहित वाणी (२४) यांनी नायगाव पोलिस ठाण्यात तक्रार देऊन आरोपींविरोधात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## गळफास घेऊन आत्महत्या



नालासोपारा : संतोष भवनच्या सीतारामनगर येथील चौबे चाळीत राहणाऱ्या रवींद्रनाथ चौबे (६०) यांनी आत्महत्या केली आहे. त्यांनी गुरुवारी रात्री राहत्या गाळ्याच्या छताच्या लोखंडी अँगलला गळफास घेत आत्महत्या केली आहे. तुळींज पोलिसांनी शुक्रवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## बांगलादेशी महिलेस पकडले

नालासोपारा : नालासोपारा पूर्वेकडील ओव्हर ब्रीज खाली एका बांगलादेशी महिलेला अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या नालासोपारा शाखेच्या पोलिसांनी गुरुवारी संध्याकाळी पकडले आहे. सीमा खान (४०) या पारपत्राशिवाय बांगलादेशातून भारतामध्ये प्रवेश करून तुळींज पोलिस ठाण्याच्या हद्दीत बेकायदेशीरपणे वास्तव्य करताना आढळल्या. तुळींज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## प्लॉटच्या नावावर लाखोंची फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : आंबावाडीच्या केसरी पार्क येथील जीवन अभिन्यूव्ह येथे राहणारे दीपक सिंग (४२) यांची जानेवारी २०२३ ते जून २०२४ दरम्यान प्लॉटच्या नावावर लाखोंची फसवणूक झाली आहे.

राधाकृष्णन व त्याचे वडील राजेंद्र नकावल्लु यांनी संगनमत करून त्यांच्या मालकीचा मालाड पूर्व येथील प्लॉटचा त्यांच्यासोबत १ करोड ५ लाखांना व्यवहार केला. व्यवहाराचे टोकन म्हणून दीपक यांच्याकडून १९ लाख रुपये ऑनलाइन, तसेच ११ लाख रुपये रोख असे ३० लाख रुपये दोघांनी घेतले, परंतु दोघांनी दीपक यांना त्या प्लॉटचे जून २०२४ पर्यंत रजिस्ट्रेशन करून दिले नाही, तसेच त्यांच्याकडून घेतलेल्या ३० लाखपैकी ६ लाख रुपये त्यांना परत करून उर्वरित २४ लाख रुपये आजपर्यंत परत न देता फसवणूक केली आहे. तुळींज पोलिसांनी शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे.

# पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

लोकसत्ता खास प्रतिनिधी

मुंबई : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील १११ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या मुंबईबाहेर करण्यात आल्या आहेत, तर ११ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या मुंबईत करण्यात आल्या आहेत. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नियमावलीनुसार या बदल्या करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. विशेष पोलीस महानिरीक्षक के. एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना यांनी बदल्यांचे आदेश शुक्रवारी काढले. मुंबई शहरात गेल्या काही वर्षांपासून कार्यरत असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याची सूचना निवडणूक आयोगाने राज्य पोलीस दलाला केली होती.

पुण्य नगरी पु.पा.४

# रेडिओ फ्रिक्वेन्सीचे साहित्य चोरणाऱ्या टोळीला अटक

## विरार गुन्हे शाखा कक्ष ३ ची कामगिरी

**। मीरा रोड :** वसई-विरार परिसरात मोबाईल टॉवरवर रेडीओ फ्रिक्वेन्सीसाठी लावण्यात येणारे मशिन, आझना कार्ड चोरी करुन विक्री करणाऱ्या टोळीला विविध राज्यातून गुन्हे शाखा कक्ष ३ विरार यांनी अटक केली आहे.

नालासोपारा पूर्वेच्या फेन अव्हेन्यु अपार्टमेंट, मदर मेरी शाळेसमोर असलेल्या इमारतीवर मोबाईल कंपनीचा टॉवर बसवला आहे. या टॉवर वर फाय जी नेटवर्कसाठी बसवलेले रेडीओ फ्रिक्वेन्सीसाठीचे आझना कार्ड (आरआर युनिट) हे कोणीतरी अज्ञात चोरट्याने २२ ऑगस्ट रोजी चोरले. याप्रकरणी १४ सप्टेंबर रोजी आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरात गेल्या काही महिन्यांपासून मोबाईल टॉवरवरील नेटवर्कसाठी बसवण्यात आलेले रेडीओ फ्रिक्वेन्सी मशिन चोरीच्या गुन्ह्यात वाढ होत आहे. याची गंभीर दखल घेऊन तपास गुन्हे शाखा कक्ष ३ यांच्याकडे वर्ग करण्यात आला. पथकाने घटनास्थळाचे तांत्रिक विश्लेषण करून, तसेच मिळालेल्या माहितीवरून शुभम विनयकुमार यादव (२४, रा. वाकोला, सांताक्रुज), शैलेश रामअभिलाश यादव (२५, रा. अंधेरी पूर्व), कपुरचंद्र सुरेश गुप्ता (२५, रा. अॅन्टॉप हील, मुंबई), बन्सीलाल केवलचंद जैन (५०, रा. राणीबाग, मुंबई)



यांना मुंबई येथून, तर जाकीर मो. सलीम मल्लीक (२५,रा. मुस्तफाबाद, पो.स्टे. दयालपुर, जि. दिल्ली), जैद अन्वर मलिक (१९, रा. मुस्तफाबाद, पो.स्टे. दयालपुर, जि. दिल्ली) यांना मुस्तफाबाद, दिल्ली येथून, तसेच मो. जुनैद मो. आरीफ मलिक (२४,रा. लोणी, जि. गाझियाबाद, उत्तर प्रदेश) यास गाझियाबाद येथून अटक करण्यात आली. आरोपींकडून अद्याप ४० लाख रुपये किंमतीचे मोबाईल टॉवरवर रेडीओ फ्रिक्वेन्सी साठी लावण्यात येणारे ३६ मशीन, मोबाईल फोन, गुन्हा करताना वापरलेली मोटर सायकल असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. दाखल असलेले २० गुन्हे उघडकीस आणले आहेत. अटक आरोपी चोरीचे मशिन हे हाँगकाँग व चीन येथे बेकायदेशीर रित्या विक्री करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अटक आरोपी यांच्याकडून बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, पंजाब, गोवा इ. राज्यातून चोरी केलेले आझना कार्ड हस्तगत करण्यात आले आहेत.

अटक आरोपी यांनी गेल्या एक वर्षापासून मुंबई, ठाणे, नवी मुंबई, वसई-विरार, नालासोपारा परिसरात मोठ्या प्रमाणात अझना कार्ड चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपी पोलीस कोठडीत आहेत. हे मशीन, आझना कार्ड हाँगकाँग व चीन येथे पाठवून त्यांचे सॉफ्टवेअर व हार्डवेअरमध्ये बदल करून पुन्हा काळ्या बाजारात जास्त किंमतीत विक्री केले जात असावेत. याबाबत तपास सुरू आहे. या गुन्हेगारांना अटक केल्यामुळे देशातील विविध राज्यांतील अशा पद्धतीचे गुन्हे मोठ्या प्रमाणावर उघडकीस येण्याची शक्यता असल्याचे पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी सांगितले.

# बेकायदा इमारतीला दंडात्मक नोटीस

## । समेळपाडा येथे सांडपाण्याची गटारे बुजवल्याचा प्रकार

**। वसई :** पुनर्विकासाच्या नावाखाली अनधिकृत बांधकाम करताना सांडपाण्याची गटारे बुजवल्याप्रकरणी नालासोपारा पश्चिम-समेळ पाड्यातील कांचन इमारतीला एक लाख रुपये दंडाची नोटीस बजावण्यात आली आहे. समेळपाड्यातील घन्सार चाळीच्या बाजूला असलेल्या कांचन इमारतीच्या पुनर्विकासाचे काम जितेंद्र सिंग नावाच्या बिल्डरकडून केले जात आहे.

या मूळच्या दुमजली इमारतीचा पुनर्विकास करताना बिल्डरने सातमजली इमारतीचे काम हाती घेतले आहे. त्यासाठी गेली आठ महिने जोरदार काम सुरू आहे.



मात्र, हे काम करीत असताना इमारतीचे सर्व साहित्य पालिकेच्या गटारावर ओतले आहे. यामुळे गटारावरील अनेक चेंबर्स तुटून त्यात बिल्डिंग मटेरियल शिरले आणि पावसाळ्यात पाण्याचा निचरा न होता ते आसपासच्या इमारतीत आणि रस्त्यावर साचून राहिले. परिणामी काही जणांचा वीजपुरवठा खंडित झाला होता.

याप्रकरणी नागरिकांनी वारंवार तक्रार केल्या. नंतर घनकचरा विभागाने संबंधित बांधकामाला नोटीस बजावली होती. मात्र तरीही गटारे तुंबवण्याचे काम बिल्डकडून सुरूच राहिले. हा प्रकार कळल्यावर घनकचरा व्यवस्थापनाचे सहाय्यक आयुक्त सुखदेव दरवेशी यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली. माती, सिमेंट, रेती, खडी, विटा, लोखंडी सळई इ. साहित्य मुख्य रस्त्यावर/गटारावर टाकल्याने सांडपाण्याचा निचरा होत नसल्याचे निदर्शनास आले.हा निचरा करण्यासाठी महापालिकेने वेळोवेळी मनुष्यबळ आणि सक्शन कम जेटिंग मशिन वापरून सांडपाण्याचा उपसा केला. त्यासाठी महापालिकेने केलेल्या कामाचे शुल्क एक लाख रुपये खर्च केले. त्यामुळे याप्रकरणी प्रशासकीय शुल्काचा भरणा सात दिवसांत करण्याची नोटीस दरवेशी यांनी बजावली आहे. हा भरणा न केल्यास पुढील कायदेशीर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

पुण्य नगरी पु पा - 9, 10

पालघर परिसर

# वाढत्या गुन्हेगारीला बसणार चाप !

## १०८२ पदे भरण्यास मंजुरी, पोलीस आयुक्तालयातील मनुष्यबळ वाढणार

मीरा रोड : मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील पहिल्या टप्प्यात ९४५ पोलीस पदांची भरती केल्यानंतर आता दुसऱ्या टप्प्यात १०८२ पदे भरण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास राज्याच्या गृहविभागाकडून मंजुरी देण्यात आली आहे. ही मंजुरी मिळाल्यामुळे पोलीस आयुक्तालयातील मनुष्यबळ वाढणार आहेत. तसेच मीरा-भाईंदर आणि वसई विरार या शहरांतील वाढती गुन्हेगारी रोखण्यास पोलिसांना मोठी मदत होणार आहे.

ठाणे ग्रामीण व पालघर जिल्हा पोलिसांचे विभाजन करून १ ऑक्टोबर २०२० रोजी मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली. सध्या पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात १८ पोलीस ठाणे आहेत. सद्यस्थितीत पोलीस आयुक्तालयात १७३५ पोलीस कर्मचारी व ३५८ पोलीस अधिकारी कार्यरत आहे. पोलीस आयुक्तालयाची स्थापना झाली तेव्हा ३३३१ पदांना मंजुरी देण्यात आली होती. त्यात ४२६ अधिकारी आणि २९०५ पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश होता. पोलिसांची रिक्त पदे भरण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू होता. २०२३ मध्ये ९९६ पदांसाठी पोलीस भरती प्रक्रिया राबविण्यात आली. नंतर दुसऱ्या टप्प्यातील १०८२ पदांची भरती करण्यास मंजुरी मिळावी, यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवला होता. तपास करून गुन्ह्यांची उकल करणे, आंदोलन, मोर्चे, राजकीय नेत्यांच्या दौऱ्यासाठी बंदोबस्त तैनात करणे इ. कारणे आहेत. या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तालयाकडून दुसऱ्या टप्प्यात आणखी १,०८२ पदे मंजूर करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारला पाठवला होता. या प्रस्तावाला शासनाच्या गृह विभागाकडून नुकतीच मंजुरी मिळाली आहे. आगामी काळात भरती प्रक्रिया राबवून ही पदे भरली जाणार आहेत. तर इतर पदेही विविध पोलीस कार्यक्षेत्रातील कर्मचाऱ्यांना बदलीद्वारे सामावून घेतले जाणार असल्याची माहिती आयुक्तालयाकडून देण्यात आली आहे.

आयुक्तालयाच्या स्थापनेपासून कायदा व सुव्यवस्था सुरळीत ठेवण्याकरिता विविध स्वरूपांच्या उपाययोजना आखण्यात येत आहेत. मात्र या योजना आखत असताना मनुष्यबळाचा तुटवडा असल्यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी राज्य सुरक्षा बलाच्या ५०० सुरक्षा



जवानांची दोन वर्षांपासून पोलीस दलाकडून मदत घेतली जात आहे. आयुक्तालय हद्दीत दररोज मोठ्या प्रमाणात गुन्हे घडत आहेत.

> पोलीस आयुक्तालयाला नवीन पद भरती करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. नवीन पद भरती झाल्यामुळे पोलीस आयुक्तालयाला अतिरिक्त मनुष्यबळ मिळणार आहे. यामुळे जास्त नागरिकांपर्यंत पोहोचण्यास व त्यांच्या तक्रारीचे निवारण लवकर करण्यास पोलिसांना मदत होणार आहे.
>
> – मधुकर पांडेय, पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय

# भाईंदर खाडी किनाऱ्यावर साकारणार काचेचा स्कायवॉक

## राज्य सरकारकडून १०० कोटींचा निधी मंजूर

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील घोडबंदर खाडी किनाऱ्याच्या विकासासोबत वॉटर फ्रंट डेव्हलपमेंटच्या दुसऱ्या टप्प्यात घोडबंदर खाडी किनारा व घोडबंदर किल्ल्याला जोडणारा काचेचा स्कायवॉक साकारण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य सरकारने १०० कोटींच्या निधीला मंजुरी दिली असून या कामाला राजच्या नगरविकास विभागाने देखील मंजुरी दिल्याची माहिती आ. प्रताप सरनाईक यांनी दिली.

हा नियोजित काचेचा स्कायवॉक सुमारे १ किलोमीटर लांबीचा प्रस्तावित असून तो पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरणार असल्याचा दावा सरनाईक यांनी केला आहे. हा काचेचा स्कायवॉक भारतातील पहिला ठरणार असून तत्पूर्वी माळशेज घाटात असा स्कायवॉक प्रस्तावित करण्यात आला आहे. मात्र त्याच्या कामाची सुरुवात अद्यापही करण्यात आलेली नाही. तत्पूर्वी मिरा-भाईंदरमध्ये पहिला काचेचा स्कायवॉक



साकारला जात असल्याने तो सर्वांच्या आश्चर्याचा विषय ठरणार आहे. तसेच या स्कायवॉकवरून चालण्याचा थरार अनुभवण्यासाठी केवळ मिरा-भाईंदरच नव्हे तर मुंबईसह आसपासच्या तसेच राज्यातील पर्यटक देखील याठिकाणी भेट देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पहिल्या टप्प्यात घोडबंदर खाडी किनाऱ्याचा विकास वॉटर फ्रंट डेव्हलपमेंटच्या माध्यमातून होत असून त्याचे काम लकवरच सुरु होणार आहे. तर दुसऱ्या टप्प्यात खाडी किनाऱ्यावरून थेट घोडबंदर किल्ल्याला तसेच नियोजित शिवसृष्टीला जोडणारा काचेचा स्कायवॉक साकारला जाणार आहे. त्याची संकल्पना सरनाईक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मांडली होती. त्याला मुख्यमंत्र्यांनी मंजुरी दिल्याचे त्यांनी सांगितले. घोडबंदर खाडी किनारा विकासाचे काम ज्याठिकाणी पूर्ण केले जाणार आहे त्या ठिकाणापासून घोडबंदर किल्ल्यावरील उंचावर असलेल्या बुरुजापर्यंत हा स्कायवॉक बांधला जाणार आहे. यामुळे जे पर्यटक खाडी किनाऱ्याला भेट देण्यासाठी येतील त्यांना थेट किल्ल्यात किंवा शिवसृष्टीत जाण्यासाठी काचेचा स्कायवॉक उपयुक्त ठरणार आहे. यामुळे किल्ल्याला अथवा खाडी किनाऱ्याला भेट देण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना एकाच दिवशी दोन्ही पर्यटनस्थळे तसेच नियोजित शिवशृष्टीला देखील भेट देता येणार आहे. त्यातून त्यांचे येथील पर्यटन पूर्ण होईल.

पुण्य नगरी पा-१

# पालिका पॅनलच्या २ स्ट्रक्चरल ऑडिटर्सकडून बोगस अहवाल

## मिरा-भाईंदर : बांधकाम अस्तित्वात नसतानाही बांधकाम असल्याचे दाखविले

भाईंदर : राजू काळे

मिरा-भाईंदर महापालिकेच्या पॅनलवर असलेल्या दोन स्ट्रक्चरल ऑडीटर्सकडून अनुक्रमे मीरारोड येथील बार व हॉटलचे बांधकाम अस्तित्वात नसतानाही दोन मजल्यांचे बांधकाम दाखवून त्यांच्या दुरुस्तीसाठी परवानगी देण्याची शिफारस प्रभाग अधिकाऱ्यांना बोगस स्ट्रक्चरल ऑडिट अहवालाद्वारे केल्याची बाब माहिती अधिकारातून उघड झाली आहे. तत्कालीन प्रभाग अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी न करता प्राप्त अहवालावर विश्वास ठेवून त्यांना दुरुस्ती परवानगी दिल्याप्रकरणी त्या प्रभाग अधिकाऱ्यांसह दोन्ही स्ट्रक्चरल ऑडिटर्सवर ठोस कारवाई करण्याची मागणी भाजपचे प्रभाग क्रमांक १८ चे अध्यक्ष नितीन नाईक यांनी शहर अभियंता दीपक खांबित यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.

हा बोगस स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल देणाऱ्या स्ट्रक्चरल ऑडिटर्सची नावे मोहम्मद शोएब भाटी व मधु एन. मिश्रा अशी आहेत. पालिकेने शहरातील इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यासाठी ३० हुन अधिक स्ट्रक्चरल ऑडिटर्सची पालिकेच्या पॅनलवर नियुक्ती केली आहे. कोणत्याही बांधकामांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यासाठी पालिकेच्या तत्कालीन महासभेत त्या ऑडिटर्सना मोबदला म्हणून शुल्क निश्चितीचा ठराव मंजूर करण्यात आला आहे. प्रभाग समिती क्रमांक ६ अंतर्गत काशिमीरा येथील स्वागत बार (समुद्रा बार) व हाटकेश सिग्नल येथील शाही हॉटेल (एडन बेकरी) यांनी पालिकेकडून स्ट्रक्चर ऑडीट करून घेण्यासाठी प्रभाग समिती ६ मधील तत्कालीन प्रभाग अधिकारी सचिन बच्छाव व योगेश गुणीजन यांच्याकडे अर्ज केला होता. या दोन्ही बांधकामांचे स्ट्रक्चर ऑडीट करून त्याचा अहवाल सादर करण्यासाठी तत्कालीन प्रभाग अधिकाऱ्यांनी स्ट्रक्चरल ऑडिटर मोहम्मद भाटी व मधु मिश्रा यांना सांगितले.

यानुसार स्ट्रक्चरल ऑडिटर मिश्रा यांनी स्वागत बारचे पूर्वीचे बांधकाम तळ मजल्याचे असतानाही त्याच्या स्ट्रक्चरल ऑडिट अहवालात तळ अधिक २ मजली बांधकाम असल्याचे नमूद केले. तसेच स्ट्रक्चरल ऑडिटर मोहम्मद भाटी यांनी शाही हॉटेलचे पूर्वीचे बांधकाम तळ अधिक १ मजल्याचे असताना ते तळ अधिक २ मजली असल्याचे स्ट्रक्चरल अहवालात नमूद केले.

या दोन्ही स्ट्रक्चरल ऑडीटोर्सकडून प्रभाग अधिकऱ्यांना बोगस अहवाल सादर केल्यानंतर प्रभाग अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणची स्थळ पाहणी करणे अपेक्षित होते. मात्र त्याची पाहणी न करताच प्राप्त स्ट्रक्चरल ऑडीटर्सकडून प्राप्त अहवालावर विश्वास ठेवून तत्कालीन प्रभाग अधिकाऱ्यांनी स्वागत बार व शाही हॉटेलला दोन मजली बांधकामाची दुरुस्ती परवानगी दिली.

### अनधिकृत बांधकामांना प्रोत्साहन?

यात पालिका पॅनलवरील दोन्ही स्ट्रक्चरल ऑडिटर्सकडून आपल्या कर्तव्याचा गैरफायदा घेत बोगस ऑडिट अहवाल सादर केला. तर जागेची प्रत्यक्ष पाहणी न करता प्राप्त स्ट्रक्चरल ऑडिट अहवालावरच विश्वास ठेवून तत्कालीन प्रभाग अधिकाऱ्यांनी अनधिकृत बांधकामांना प्रोत्सहन देत दुरुस्ती परवानगी दिल्याचा आरोप नाईक यांनी केला आहे. याप्रकरणी दोन्ही स्ट्रक्चरल ऑडिटर्सची पालिकेच्या पॅनलवरील सेवा खंडीत करून अधिकाऱ्यांवर ठोस कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नाईक यांनी शहर अभियंता दीपक खांबित यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.

### २ हॉटेलचे अनधिकृत वाढीव बांधकाम

बांधकाम अस्तित्वात नसतानाही देण्यात आलेल्या दुरुस्ती परवानगीनंतर स्वागत बार व शाही हॉटेलच्या मालक व चालकांनी अनुक्रमे दोन व एक मजल्याचे अनधिकृत वाढीव बांधकाम केल्याची बाब माहिती अधिकारातून उघडकीस आली आहे. त्यात बोगस स्ट्रक्चरल ऑडिट अहवालासह दुरुस्ती परवानगीची धक्कादायक बाब उजेडात आली आहे.

पुढारी पा. 7

# कांदळवनाचा ऱ्हास केल्याप्रकरणी गुन्हे

मिरारोड : भाईंदर पश्चिमेला खाडी किनारी तिवरांची झाडे असलेल्या कांदळवन परिसरात मेरी टाईम बोर्डाकडुन पर्यावरण परवानगी न घेता तिवरांच्या झाडांचे नुकसान करून जेट्टीचे काम सुरू आहे. तसेच दुसऱ्या गुन्ह्यात कांदळवन असलेल्या जागेत विनापरवानगी खाजगी विकासकाकडून पे- अँड पार्किंग सुरू आहे. याप्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर जेट्टीचे काम सुरू असलेल्या ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्यात आलेला असून संबधीत अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही, त्यांच्यावर सुद्धा गुन्हा दाखल करून त्यांना आरोपी करावे व टाकलेला भराव काढून ती जागा पूर्ववत करण्याची मागणी पर्यावरण प्रेमी नागरिकांनी केली आहे.

सामना पा ५, ३

## मुंबईतील १११ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी)- केंद्रीय निवडणूक आयोगाने आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षकांच्या रखडलेल्या बदल्यांवरून नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर खडबडून जागे झालेल्या गृहविभागाने मुंबई पोलीस दलातील १११ अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश जारी केले. अन्य जिल्ह्यांतील ११ पोलीस निरीक्षकांची मुंबईत बदली करण्यात आली आहे. दरम्यान, सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन अलकनुरे व जितेंद्र आगरकर यांचीही जिल्हा बदली करण्यात आली आहे.

## दोन गुन्हे

भाईंदर : पश्चिमेला खाडीकिनारी कांदळवन परिसरात झाडांचे नुकसान करून मेरीटाईम बोर्डाकडून विनापरवाना काम सुरू होते, तर दुसऱ्या घटनेत कांदळवन जागेत बेकायदा खासगी बिल्डरकडून पे अँण्ड पार्किंग सुरू होती. कांदळवनाचा ऱ्हास केल्याने ठेकेदार सतीश गुप्ता आणि बेकायदा पार्किंगप्रकरणी सुरेंद्र शुक्ला, हेमंत शाह, शुभम तिवारी, लक्ष्मण सुरेश आणि चिराग दुबे यांच्याविरोधात भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

नवभारत पुणा 7.4

## बजरंग दल का हंगामा, MBVV पुलिस कर रही मामले की जांच

# मोटिवेशनल स्पीच की आड़ में धर्म परिवर्तन

■ मीरा रोड, (सं). मीरा रोड पूर्व के एस. के. स्टोन के पास स्थित सेंट्रल पार्क हॉल में मोटिवेशनल स्पीच की आड़ में धर्म परिवर्तन किए जाने के आरोप के बाद शनिवार शाम को बजरंग दल के कार्यकर्ताओं ने हंगामा शुरू कर दिया. हालांकि मीरा रोड पुलिस ने समय पर आकर मामले को शांत किया और पूछताछ तथा जांच के लिए कुछ लोगों को हिरासत में लिया है. हंगामा करने वाले बजरंग दल के कार्यकर्ताओं का कहना था कि हमारा कोई भी कार्यक्रम होता है, उसमें किसी को भी आने जाने की पाबंदी नहीं होती, लेकिन इस कार्यक्रम में तो पुलिस वालों को भी हॉल में जाने से क्यों रोका गया? बजरंग दल से जुड़े रूपेश दुबे ने



आरोप लगाया है कि पुलिस और हॉल, जमीन मालिक को गुमराह कर यहां जबरन और प्रलोभन देकर धर्म परिवर्तन कराया जा रहा था. यहां तक कि आयोजकों ने पुलिस को भी हॉल में जाने से रोका. बाथटब में डुबकी लगाकर बपतिस्मा करके धर्म परिवर्तन का कार्यक्रम चल रहा था.

*मीरारोड पुलिस थाना अंतर्गत तीन दिवसीय धार्मिक कार्यक्रम का आयोजन किया गया है. कुछ लोगों की शिकायत है कि यहां जबरदस्ती धर्म परिवर्तन का कार्यक्रम चल रहा है. शिकायत के आधार पर हमने जांच शुरू की है जांच के बाद पता चलेगा सच्चाई क्या है*

*- प्रकाश गायकवाड, DCP, जोन - 1,MBVV पुलिस*

# 111 पुलिस निरीक्षकों का तबादला मुंबई से बाहर

## 11 इंस्पेक्टरों को दूसरे शहर से भेजा गया मुंबई

■ मुंबई (सं). केंद्रीय चुनाव आयोग (ईसीआई) के आदेशों का पालन करते हुए मुंबई पुलिस ने 111 पुलिस इंस्पेक्टर रैंक के अधिकारियों और मुंबई के ही दो सहायक पुलिस आयुक्त को शहर से बाहर स्थानांतरित कर दिया है. इसमें करीब 15 पुलिस स्टेशनों के वरिष्ठ पुलिस निरीक्षक भी शामिल है. हालांकि राज्य पुलिस द्वारा 11 पुलिस इंस्पेक्टर को दूसरे जिले और शहर से मुंबई भेजा गया है. चुनाव आयोग ने पहले मुंबई पुलिस से स्पष्टीकरण मांगा था कि इन अधिकारियों का तबादला क्यों नहीं किया गया, जबकि वे पिछले तीन सालों से शहर की पुलिस में कार्यरत हैं. महाराष्ट्र पुलिस ने एक आदेश जारी कर अधिकारियों को तुरंत शहर से बाहर स्थानांतरित करने का निर्देश दिया है.



■ इसमें मुंबई स्थित सायन पुलिस स्टेशन की वरिष्ठ पुलिस निरीक्षक मनीषा शिर्के को ठाणे, दिंडोशी के सीनियर इन्स्पेक्टर इरफ़ान शेख को ठाणे, मुलुंड के प्रमोद कोकाटे हाईवे ट्रैफिक,मरीन ड्राइव के नीलेश बागुल को ठाणे,मलाड के रविंद्र अड़ाने को ठाणे, सांताक्रूज के राजेंद्र काणे को रत्नागिरी भेजा गया है.

■ सहायक पुलिस आयुक्त नितीन अलकनुरे ठाणे ख़ुफ़िया विभाग में और सहायक पुलिस आयुक्त जितेन्द्र अगरकर को ठाणे पुलिस मुख्यालय में भेज दिया गया है. वडाला टीटी पुलिस स्टेशन के विलास राठोड, माहिम के बिलाल शेख आदि को भी तबादला मुंबई के बाहर हुआ है. पुलिस ने चुनाव आयोग को बताया था कि महाराष्ट्र के अन्य स्थानों पर भी आदेश का पालन किया गया है.

NTB नवभारत टाइम्स मुं पा-५।



# मीरा-भाईंदर में 16 घंटे तक सड़क पर पड़ी रही मृत गाय



**हाल में मिला है राज्य माता का दर्जा, मनपा ने नहीं ली सुध**

**निसं, मीरा-भाईंदर:** राज्य सरकार ने गाय को हाल में 'राज्य माता' का दर्जा दिया है। मीरा-भाईंदर में एक कार्यक्रम के दौरान सीएम एकनाथ शिंदे ने इसकी घोषणा की थी। उसी शहर में एक मृत गाय सड़क पर लगभग 16 घंटे तक पड़ी रही। सूत्रों ने बताया कि मीरा-भाईंदर मनपा को सूचित भी किया गया, लेकिन 16 घंटे तक किसी ने सुध नही ली। जानकारी के मुताबिक, शुक्रवार रात 12 बजे मीरा-भाईंदर मनपा के लता मंगेशकर नाट्यगृह के पास एक मृत गाय की सूचना मिली। शनिवार दोपहर 3 बजे तक मनपा ने दहन नही किया। इस बात की सूचना जब मनसे पदाधिकारियों को मिली, तब उन्होंने मनपा की खिंचाई की। अंततः दोपहर 4 बजे के आस-पास मनपा प्रशासन मृत गाय के लिए लेकर गई। इस घटना से गोरक्षकों में नाराजगी है।

विहिप से जुड़े मयूर उचगावकर कहते है कि मनपा के संबंधित विभाग और जिम्मेदार अधिकारी पर कार्रवाई करनी चाहिए।

पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. विक्रम निराटले ने कहा कि गाय की मौत होने की हमे जानकारी नही है। इस बारे में वसई स्थित कोरा केंद्र नामक संस्था को सूचित किया गया है। गाय के दहन की प्रक्रिया कोरा केंद्र संस्था करेगी।



# मीरा-भाईंदर: धार्मिक कार्यक्रम पर विवाद

**एक गुट ने लगाया धर्मांतरण का आरोप**

**निसं, मीरा-भाईंदर:** शनिवार को मीरा-भाईंदर में आयोजित एक धार्मिक कार्यक्रम को लेकर दो गुटों में तनाव की स्थिति हो गई। विरोधी गुट ने कार्यक्रम के आयोजक पर धर्मांतरण का आरोप लगाया। कार्यक्रम स्थल पर तनाव बढ़ गया और अंततः पुलिस को हस्तक्षेप करना पड़ा। आयोजन एस.के. स्टोन स्थित मैदान में हो रहा था। जानकारी के अनुसार, 'यहोवा के साक्षीदार' संस्था ने 3 दिवसीय कार्यक्रम का आयोजन किया था। शनिवार को कार्यक्रम का दूसरा दिन था। कार्यक्रम में राज्यभर से लोग पहुंचे थे। दोपहर 4 बजे के आस-पास बजरंग दल के लोग कार्यक्रम स्थल पर पहुंचे और नारेबाजी करने लगे। बजरंग दल का आरोप है कि कार्यक्रम में धर्मांतरण हो रहा है और पैसे देकर धर्म परिवर्तन किया जा रहा है।

**पुलिस ने मामले को संभाला:** डीसीपी प्रकाश गायकवाड कार्यक्रम स्थल पर पहुंचे और मामले को नियंत्रित किया। डीसीपी ने बताया कि पुलिस मामले की जांच कर रही है। पुलिस ने कार्यक्रम में शामिल 41 लोगों से पुलिस स्टेशन में पूछताछ की और बाद में उन्हें छोड़ दिया।

**'हम धार्मिक प्रथाओं का पालन कर रहे थे':** आयोजक समिति के प्रवक्ता मुकेश गायकवाड ने बताया कि हम अपनी धार्मिक प्रथाओं का पालन कर कार्यक्रम कर रहे थे। किसी को इसे लेकर भ्रम हो गया। संस्था एक सदी से इस तरह के राज्य स्तरीय कार्यक्रम कर रही है। हमारी धार्मिक भावनाओं का अनादर हुआ है।

The free Press Journal P. 5

nal.in

**POLICE REJIG | Controversial Santacruz Inspector Rajendra Kane and Crime Inspector Amar Patil among those transferred**

# DGP relents to ECI and transfers 111 inspectors

**Megha Kuchik**
MUMBAI

The director general of police (DGP) has finally relented to the Election Commission of India's order and transferred 111 inspectors out of Mumbai. With assembly elections due in November, the ECI had on July 31 instructed the government and the police to transfer all those officials who are posted in their home districts and those who have been in the same place for three or more years.

According to rules, prior to elections, officers who have served more than three years in an area have to be moved out. The Maharashtra Police issued an order on Friday directing the 111 inspectors to be transferred out of the city. Controversial Santacruz Inspector Rajendra Kane and Crime Inspector Amar Patil are among those transferred. Kane has been sent to Ratnagiri, and Patil to Nagpur.

**Prior to elections, officers who have served more than three years in an area have to be moved out**

Initially the Maharashtra Police did not follow through on the ECI order. However, the ECI sent a notice to the police, demanding clarification for non-compliance and requesting a formal report. The chief secretary and the DGP were supposed to submit action-taken reports by August 20 but failed to do so. Afterwards, the ECI sent three reminders regarding the pending report. The Maharashtra Police informed the ECI that, aside from Mumbai, other regions in the state had complied with the transfer orders. Subsequently, the Mumbai Police requested the ECI again, seeking an exemption for these officers. Eventually, with assembly elections approaching, the DGP transferred 111 inspectors out of the city, and assigned 11 new inspectors to Mumbai.

Kane and Patil had faced a departmental inquiry after a junior officer filed a complaint against them with the deputy commissioner of police. The junior officer accused Kane of preventing the filing of an FIR in an extortion case. The Free Press Journal first reported the case, highlighting allegations made by both an activist and the junior officer.

Social activist Aftab Siddique posted on X: "The Election Commission of India rejected the home ministry of Maharashtra's reply regarding the transfer of Mumbai police officers before the 2024 assembly elections. On October 4, I received a reply from the Maharashtra Election Commission office, confirming that the officers were transferred." "Satyamev Jaytey corruption and connivance out of Mumbai," she said.

Siddique had frequently approached senior officers regarding the Santacruz extortion case, demanding the transfer of both Kane and Patil.

The Times of Riviere P-8

# 7 held for stealing radio units from mobile phone towers

## Equipment Sold In China And Hong Kong: Cops

TIMES NEWS NETWORK

**Mumbai:** A gang of seven men has been arrested for allegedly stealing Remote Radio Units (RRUs) from mobile towers and selling them to buyers in China and Hong Kong.

The Mira Bhayander Vasai Virar crime unit 3 at Virar was assigned the responsibility of probing the escalating incidents of RRU thefts. On August 22, the theft of an RRU was reported from the rooftop of a residential building in Nalasopara. RRUs are transceivers that facilitate the connection between wireless devices and networks.

The police apprehended Shubham Yadav, a 24-year-old resident of Santacruz, who subsequently led them to his seven accomplices residing in Mumbai, Delhi, and Uttar Pradesh.

The gang's modus operandi involves targeting a cellphone tower and monitoring the surrounding activity. While two to three members ascend the tower to steal the equipment, the others wait nearby on motorcycles to make a swift getaway with the stolen goods. According to the police, this gang has been active for more than a year.

The police have solved 20 cases of RRU thefts in the Vasai region, Mumbai, Thane, and Bihar thus far. They recovered 36 stolen RRUs with an estimated value of Rs 40 lakh. The authorities stated that these devices are highly sought after in China and Hong Kong.

The police have not dismissed the possibility of the gang having members spread across the country. They are currently investigating how the stolen equipment is transported to foreign countries.

Hindustan Times

# STATE TRANSFERS THREE SENIOR POLICE OFFICERS

Yogesh Naik

yogesh.naik@hindustantimes.com

**MUMBAI:** A day after the Mumbai police relented to the Election Commission of India's (ECI) orders and transferred 111 inspector rank officers out of the city, the state police headquarters asked the additional chief secretary (home) I S Chahal to transfer one additional commissioner and three deputy commissioners of Mumbai police.

The ECI had earlier sought an explanation from the Mumbai police as to why these officers had not been transferred, despite them serving in the city police for the past three years.

According to rules, prior to elections, officers who have served more than three years in an area have to be moved out so that they don't influence elections.

The state police headquarters stated that additional commissioner Rajiv Jain of Mumbai north region, deputy commissioners Sanjay Latkar (port zone), Prashant Kadam of Zone 4 and Hemraj Rajput of Zone 6 should be transferred. Chahal told HT that ECI's orders will be implemented soon.